॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/विवि /रक्तदान/ २६३ /२०२४ दि. १३/१२/२०२४

**प्रति,**

१) मा.प्राचार्य/ संचालक विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था

२) मा.संचालक, विभाग प्रमुख विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग

**विषय :- महाविद्यालयांमध्ये रक्तदान शिबिर आयोजनाबाबत ..**

**संदर्भ :- सह प्रशासकीय अधिकारी, इंडीयन रेडक्रॉस सोसायटी, जळगाव यांचे पत्र जा.क्र. नोव्हें-१४/२०२४-२५, दि. १२ नोव्हेंबर, २०२४**

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जळगाव रक्तकेंद्र हे गेल्या ४२ वर्षापासून संपूर्ण जिल्हा आणि जवळपास जिल्ह्यातील रूग्णांना सुरळीत व सुरक्षित रक्तपुरवठा करीत आहे. अद्ययावत तंत्रज्ञान, प्रशिक्षित स्टाफ व सर्मपित सेवाभावना यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक असलेल्या अद्यावत रक्तकेंद्रामध्ये गरजू रूग्णांना रक्त पुरवठा करण्यात अग्रेसर आहे.

सद्यपरिस्थितीत रेडक्रॉस रक्तकेंद्रात रक्ताचा खूपच तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे रूग्णांना सेवा देताना खूप अडचणी येत आहेत. आपल्या अखत्यारीतील सर्व महाविद्यालयांना रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याबाबत सूचना देऊन या सामाजिक कार्यात सहभाग नोंदवण्याचे आवाहन करावे. आपल्या बहुमोल योगदानामुळे व रक्तदात्यांच्या उत्स्फूर्त रक्तदानामुळे रक्तकेंद्रामार्फत रूग्णांना सुरळीत सेवा देणे सहज शक्य होईल. तसेच रक्तदान शिबिरासोबतच **विद्यार्थ्यांचे जनरल आरोग्य तपासणी, रक्तगट तपासणी, गरजू मुलींची हिमोग्लोबिन तपासणी** उपक्रम हि राबविता येईल. तरी या जीवनदायी उपक्रमासाठी आपले सहकार्य मिळावे अशी विनंती केलेली आहे.

विद्यापीठ संलग्नित नियमित प्रवेशित विद्यार्थ्यांना रक्तदान केल्याबद्दल अध्यादेश १६३ नुसार अंतीम परीक्षेसाठी २ ग्रेस गुण देण्यात येत असतात. इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जळगाव यांचे कडून प्राप्त पत्रानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांना रक्तदान बरोबरच **जनरल आरोग्य तपासणी, रक्तगट तपासणी, गरजू मुलींची हिमोग्लोबिन तपासणी** तसेच रक्तदान केलेल्या विद्यार्थ्यांचा रक्त गट सुची देखील ते विद्यापीठास उपलब्ध करुन देणार आहेत.

प्राप्त आदेशान्वये आपण आपल्या महाविद्यालयात राबविण्यात येणा-या रक्तदान उपक्रमासाठी **इंडियन रेडक्रॉस सोसायटी, जळगाव यांना आमंत्रित करावे**, हि विनंती.

आपला विश्वासू,

14-12-2024

(डॉ. जयेंद्र दि. लेकुरवाळे)

**संचालक, विद्यार्थी विकास**

**सोबत- संदर्भिय पत्राची प्रत.**

**प्रत :-**

**डॉ. राजेश सुरवळकर,** सह प्रशासकीय अधिकारी, इंडीयन रेडक्रॉस सोसायटी, जळगाव

प्रत माहितीसाठी :-

१) मा. कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

२) मा. प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

३) मा. कुलसचिव, कबचौउमवि, जळगाव

D/Shivade/General letter

# Indian Red Cross Society

DISTRICT BRANCH : JALGAON (MAHARASHTRA) Regi.No. : E-21 Dated 13.07.1953

"Redcross Bhavan", Civil Hospital Road, Jalgaon - 425 001.

Phone : 0257-2226233, 2235855, 2236255 Email : ircs_jal@yahoo.in, ircs1953@gmail.com

Facebook : ircsjalgaon Web. : www.redcrossjalgaon.org App. : Redcross



✦ President & District Collector : Ayush Prasad (IAS)

✦ Vice President : Gani Memon ✦ Chairman : Vinod Biyani

✦ Treasurer : Bhalchandra Patil ✦ Blood Centre Chairman : Dr. Prasannakumar Redasani


जावक.क्र. नोव्हें- १४/२०२४-२५

दिनांक १२ नोव्हेंबर २०२४

प्रती,

संचालक

विद्यार्थी विकास

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

विषय महाविद्यालयांमध्ये रक्तदान शिबिर आयोजनाबाबत

मा. महोदय,

इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगाव रक्तकेंद्र हे गेल्या ४२ वर्षापासून संपूर्ण जिल्हा आणि जवळपासच्या जिल्ह्यातील रुग्णांना सुरळीत व सुरक्षित रक्तपुरवठा करीत आहे. अद्ययावत तंत्रज्ञान, प्रशिक्षित स्टाफ व समर्पित सेवाभावना यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक असलेल्या अद्यावत रक्तकेंद्रामध्ये गरजू रुग्णांना रक्तपुरवठा करण्यात अग्रेसर आहे.

सद्य परिस्थितीत रेडक्रॉस रक्तकेंद्रात रक्ताचा खूपच तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे रुग्णांना सेवा देताना खूप अडचणी येत आहेत.आपणास नम्र विनंती कि, आपल्या अखत्यारीतील सर्व महाविद्यालयांना रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याबाबत सूचना देऊन या सामाजिक कार्यात सहभाग नोंदवण्याचे आवाहन करावे. आपल्या बहुमोल योगदानामुळे व रक्तदात्यांच्या उत्स्फूर्त रक्तदानामुळे रक्तकेंद्रामार्फत रुग्णांना सुरळीत सेवा देणे सहज शक्य होईल. तसेच रक्तदान शिबिरासोबतच विद्यार्थ्यांचे जनरल आरोग्य तपासणी,रक्तगट तपासणी, गरजू मुलींची हिमोग्लोबिन तपासणी उपक्रम हि राबविता येईल.

तरी या जीवनदायी उपक्रमासाठी आपले सहकार्य मिळावे हि विनंती

आपल्या सहकार्याच्या प्रतीक्षेत

विनीत,

डॉ. राजेश सुरळकर

(सह प्रशासकीय अधिकारी)

9422222604

7020988116

कार्यालय ... उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

१४ विद्यार्थी विकास विभाग

27 NOV 2024

आवक क्र. 1672